दैनिक
# आपला विदर्भ

दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 176 ■ गुरूवार, दि. 06 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI. NO.MAHMAR/2023/88006

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



## माघी वारी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई




८ फेब्रुवारी रोजी माघी वारी अर्थात जया एकादशी सोहळा संपन्न होत आहे यानिमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, नामदेव पायरी, तुकाराम भवन, व्हीआयपी गेट, पश्र्चिमद्वार, यासह संपूर्ण मंदिरास आकर्षक रंगीबेरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे विठुरायाचे मंदिर अधिकच खुलून दिसत आहे.

# राज्याच्या विकासाचा वेग कायम राखण्यासाठी विकास आराखडा महत्त्वाचा - मुख्यमंत्री फडणवीस

## मुंबईमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : विकसीत भारत २०४७ यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पथदर्शी कार्यक्रमास सुसंगत विकास आराखडा तयार करणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही.आर. सुब्रह्मण्यम यांनी आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची मेघदूत या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.**



या भेटीवेळी श्री. सुब्रह्मण्यम यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे निती आयोगाच्या संकल्पना आणि राज्याने कोणत्या क्षेत्रात काम करण्याची अपेक्षा आहे याविषयी माहिती दिली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, 'राज्याच्या विकासाचा वेग इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. भविष्यात त्यात वाढ करण्यासाठी काम करत आहोत. तसेच राज्यात अनेक मोठे प्रकल्प आणि विकास कामे सुरू आहेत. त्यांना गती दिली जात आहे. नवीन गुंतवणूक येत आहे.'

श्री. सुब्रह्मण्यम म्हणाले की, मुंबई मध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. २ ट्रिलियन क्षमतेचे मुंबई हे देशातील एकमेव शहर आहे. महाराष्ट्राने कृत्रिम बुद्धिमत्ता, जैव तंत्रज्ञान आणि क्वांटम संगणक क्षेत्रात काम करावे. या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रात संधी आणि क्षमता दोन्ही आहेत. ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्राने केलेले काम देशात सर्वोत्कृष्ट आहे. राज्याचे हे काम देशातील इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरावे. महाराष्ट्राचा विकासाचा आराखडा तयार आहे. त्यास आणखी वेग देण्यात यावा. सुरू असलेल्या विकासकामांचे वॉर रुमच्या माध्यमातून नियमित आढावा घेतला जावाअशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## पुणे, सोलापूरनंतर जीबीएसचा खान्देशात शिरकाव

### नंदुरबारमधील दोन बालकांना लागण; एकाची प्रकृती चिंताजनक

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यापाठोपाठ राज्याच्या इतर भागातही गुलेन बॅरी सिंड्रोम अर्थात जीबीएस या दुर्मिळ आजाराचे रुग्ण सापडण्याचे प्रकार सुरुच आहे. पुणे, सोलापूर, नागपूर, सातारा पाठोपाठ आता जीबीएस आजाराने खान्देशात शिरकाव केलाय. नंदुरबारमधील दोन बालकांना जीबीएस आजाराची लागण झाली आहे. यामुळे नंदुरबारमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

नंदुरबार येथे जीबीएसचे दोन रुग्ण आढळले असून दोन्ही रुग्ण हे लहान बालकं आहेत. तर दोघांपैकी एक रुग्णाची प्रकृती चिंताजनक आहे. चिंताजनक असलेल्या लहान बालकाला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. ज्या गावातून हे रुग्ण आढळले आहेत. त्या ठिकाणाच्या पाणीच्या तपासणी केली जाणार आहे.

दरम्यान, नंदुरबारमध्ये जीबीएसचे दोन रुग्ण आढळल्याने आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. नंदुरबारमध्ये २० आयसीयू बेड तयार करण्यात आले आहेत. जीबीएस या आजारासाठी जिल्हा प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. नागरिकांनी घाबरून जावू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, अहिल्यानगर शहरातील रुग्णालयात जीबीएसचे चार रुग्ण आढळल्याचे समोर आले आहे. हे चौघंही रुग्ण शहराबाहेरील असून एकाला पुण्याच्या ससूनमध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. तर इतर तिघांवर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दरम्यान, जीबीएस आजाराच्या पार्श्र्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेचा वैद्यकीय विभाग अलर्ट मोडवर आला आहे. नाशिक महापालिकेच्या दोन रुग्णालयात विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. नाशिक महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाचे डॉ. झाकीर हुसेन रुग्णालय आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (बिटको) रुग्णालयात विशेष कक्षाची स्थापना केली आहे.

## १२वी पास अन् सरकारी नोकरी! अंगणवाडीमध्ये नोकरीची सुवर्णसंधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सरकारी नोकरीच्या शोधात असणाऱ्या महिलांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. अंगणवाडीमध्ये म दतनीस पदासाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढील १०० दिवसांत अंगणवाडीमधील रिक्त पदे भरण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे अंगणवाडी केंद्रात कामासाठी इच्छुक असणाऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी असणार आहे.

शिक्षण आणि वयोमर्यादा

महिला व बालविकास विभागाअंतर्गत ही भरती केली जाणार आहे. सध्या अंगणवाडी मदतनीस पदासाठी भरती जाहीर केली आहे. त्यासाठी १२वी पास असणे गरजेचे आहे. तसेच पदव्युतर, डी एड, बी एड आणि एम एससीआयटी कोर्स पूर्ण केलेले असणे गरजेचे आहे. या भरतीसाठी १८ ते ३५ वयोगटातील उमेदवार अर्ज करु शकणार आहेत.

या नोकरीसाठी ऑफलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात आले आहेत. याबाबत अर्जप्रक्रिया सुरु झाली असून १८ फेब्रुवारी २०२५ ही अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख असणार आहे. तसेच या नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराला नगर परिषदनगर पंचायत नगर पालिका नगर पंचायत ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील असणे गरजेचे आहे. रहिवासी असल्याचा पुरावा जोडणे गरजेचे आहे.

# सुरेश धसांनी चिठ्ठी देताच मुख्यमंत्री फडणवीसांकडून नव्या बीडची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं तोंड भरुन कौतुक केले होते, त्यानंतर, भाषण करताना देवेंद्र फडणवीस यांनीही आमदार सुरेश धस यांचे कौतुक करताना या तालुक्यातील आधुनिक भगिरथ असे म्हटले. दरम्यान, सुरेश धस यांनी भाषणावेळी फडणवीसांना चिठ्ठी आणून दिली. तर, ही चिठ्ठी ३ टीएमएसीची असल्याचे फडणवीस यांनी म्हटले. तसेच, यानिमित्ताने सरपंच परिषदेच्या लोकांनीही अनेक मागण्या माझ्याकडे केल्या आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अतिशय दुर्दैवी आहे, अशा घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. याप्रकरणी प्रत्येकावर कारवाई केली जाईल, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी बीडकरांना दिला. आपण छत्रपती शिवरायांचे मावळे आहोत, शिवरायांनी १८ पगड जातींना एकत्र करुन स्वराज्याची निर्मिती केली.



त्याप्रमाणेच सर्वांना एकत्रित घेऊन आपल्या इथं नांदायचे आहे, आणि एक नवीन बीड आपण तयार करू, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

आधुनिक भगिरथ म्हणून या तालुक्यात ज्यांचा उल्लेख यापुढे होईल, ते आमदार सुरेश धस असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार धस यांच्या कामाचे कौतुक केले. कार्यक्रमाला उपस्थित लाडक्या बहिणींचाही त्यांनी आवर्जुन उल्लेख केला. एका महत्त्वाच्या कामाचे भूमीपूजन करण्यासाठी मी आज इथं आलोय. गोपीनाथ मुंडे यांनी विशेष प्रयत्न करुन कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्याला २३ टीएमसी पाणी मिळाला पाहिजे असा निर्णय झाला, पण दुर्दैवाने काही कारणास्तव केवळ ७ टीएमसी पाणी आपल्याला सापडलं. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर २३ टीएमसी पाणी मराठवाड्याला द्यायचा निर्णय घेतला, पण केवळ ७ टीएमसीच पाणी असल्याचं दिसून आलं. त्यातच, आमदार सुरेश धस यांच्या मागणीनुसार महायुती सरकारने पहिली सुप्रमा आष्टीमधील या प्रकल्पाला दिली. तब्बल ११ हजार कोटी रुपयांची सुप्रमा या कामाला देण्यात आल्याचे फडणवीस यांनी म्हटले. धससाहेब, तुम्ही २-३ टीएमसीचं मागणी करताय, पण ५३ टीएमसी पाणी गोदावरीत आणण्यासाठी आपण काम करतोय, ते झालं तर म राठवाड्याची पुढची पिढी दुष्काळ बघणार नाही, दुष्काळ हा भूतकाळ होईल, असे फडणवीस यांनी म्हटले.

दरम्यान, मराठवाड्यातील पाणी आणि सरकारचे प्रयत्न यावर बोलल्यानंतर भाषणाच्या शेवटी आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्र्यांना चिठ्ठी आणून दिली. त्यावेळी, सुरेश धस यांनी भाषणावेळी फडणवीसांना चिठ्ठी आणून दिली. तर, ही चिठ्ठी ३ टीएमएसीची असल्याचे फडणवीस यांनी म्हटले. तसेच, यानिमित्ताने सरपंच परिषदेच्या लोकांनीही अनेक मागण्या माझ्याकडे केल्या आहेत. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या खुनाची घटना अतिशय दुर्दैवी आहे, अशा घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. याप्रकरणी प्रत्येकावर कारवाई केली जाईल, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी बीडकरांना दिला. तसेच, बीड जिल्ह्याला बड्या नेत्यांचा इतिहास आहे, तोच इतिहास आपल्याला पुढे न्यायचा आहे. बीडचा गौरवशाली इतिहास तयार करण्याकरता आपल्या सर्वांच्या प्रयत्नांच्या पाठीशी मी देखील ठामपणे उभा आहे, असे म्हणत फडवणीसांनी आपण नवीन बीड तयार करू, असे म्हटले.

## वाल्मिक कराडची ईडी चौकशीची मागणी फेटाळली

### याचिकाकर्त्यांना २० हजारांचा दंड

**बीड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरण गेल्या दीड महिन्यांपासून चांगलेच चर्चेत आले आहे. हत्या प्रकरणात संशयित असलेल्या वाल्मिक कराडवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तर वाल्मिक कराडने मोठ्या प्रमाणात 'माया' जमवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वाल्मिक कराडची ईडीमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जात होती. त्यातच वाल्मिक कराडविरोधात ईडीने स्वतंत्र गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्याची मागणी करत हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, वाल्मिक कराडविरोधात ईडी चौकशीची मागणी करणारी याचिका हायकोर्टाने फेटाळली आहे.

आरटीआय कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी वाल्मिक कराडची ईडी चौकशीची मागणी करणारी याचिका हायकोर्टात दाखल केली होती. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास हायकोर्टाच्या देखरेखीखाली एसआयटीमार्फत सुरू करण्याचीही याचिकेत मागणी करण्यात आली होती. एका कॅबिनेट मंत्र्याचं नाव सातत्यानं येत असल्यानं पोलिसांच्या तपासात अनेक मर्यादा येत असल्याचा आरोप देखील याचिकेतून करण्यात आला होता. याप्रकरणी मंत्री महोदयांशी संबंधित अनेक कंपन्या आणि मालमत्तासमोर येत असल्यानं याचिकेत निवडणूक आयोगही प्रतिवादी करण्यात आला होता.

आता वाल्मिक कराडविरोधात ईडी चौकशीची मागणी करणारी याचिका हायकोर्टानं फेटाळली आहे.

## गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्र्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्र्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्ञाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर – जयकिशन, मदन – मोहन, उषा खन्ना, कल्याणजी – आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत – प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशिवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# मेहकरात शिवसेनेची आढावा बैठक व सत्कार समारंभ







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची बुलढाणा जिल्हा (घाटावरील पदाधिकारी) यांची विभागीय स्तरीय संघटनात्मक आढावा बैठक तसेच उपनेते व आमदार नितिनबापु देशमुख (बाळापूर) व आमदार सिद्धार्थ खरात यांचा सत्कार कार्यक्रम ५ फेब्रुवारी रोजी घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर हे होते. तर, यावेळी जिल्हाप्रमुख जालींधर बुधवत, सह संपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख विजयाताई खडसान, जिल्हा संघटक गोपाल बछिरे, युवासेना जिल्हा प्रमुख नंदू कजहाडे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, शहर प्रमुख किशोर गारोळे, युवासेना तालुका अधिकारी आकाश घोडे, महेंद्र पाटील,ॲड.दिपक मापारी, लखन गाडेकर, किसन धोंडगे, विधानसभा संघटक किसन पाटील, माजी जि.प.सदस्य दिलीप वाघ,किसान सेना उपजिल्हा प्रमुख नारायण बळी, जिजाताई राठोड, तारामती जाधव, स्वाती नवले, संजीवनी वाघ, आरती देशमुख, माजी नगराध्यक्ष,अशोक अडेलकर,संदीप गारोळे, ॲड.संदीप गवई,भागवत बोरकर,युवा सेना शहर अधिकारी ऋषी जगताप,नगमा गवळी,माजी जि.प.सदस्य संजय वडतकर, वसंतराव आलटे, माजी सभापती सतिश ताजने आदी पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना शिवसेना उपनेते आमदार नितीन देशमुख म्हणाले की, शिवसेनेत बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणुकीनुसार बुथ प्रमुख सुद्धा तेवढाच महत्त्वाचा आहे.संघटना मजबुतीसाठी त्यांचे योगदान मोठे असते. तेव्हा वरिष्ठ पदाधिकारी यांनी बुथ प्रमुखापर्यंत लक्ष देऊन संघटना मजबुतीकरिता मेहनत घ्यावी. बुथ प्रमुखांच्या संपर्कात रहावे. त्याच्या अडचणी सोडवाव्यात. यामुळे संघटना वाढीस चालना मिळते. बुलढाणा जिल्ह्यात आपले संघटन क्रमांक एकवरच राहिले पाहिजे, यासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घ्यावे, असे आवाहन केले.

तसेच यावेळी संदीप शेळके, युवा सेना जिल्हा अधिकारी नंदच कर्हाडे,महिला आघाडी जिल्हा प्रमुख विजया पाटील खडसान,सहसंपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत,आमदार सिध्दार्थ खरात, संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांची भाषणे झाली. उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून संचालन केले.तालुका प्रमुख निंबाजी पांडव यांनी आभार मानले.

यावेळी माजी जि.प.सदस्य संजय वडतकर यांनी रा.काँ.(शरद पवार) गटातून शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना उपनेते तथा आ.नितीन देशमुख, आ.सिध्दार्थ खरात, संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवतसह मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले.

# ‘महिमा’ ला न्याय मिळविण्यासाठी पळशी फाट्यावर पुन्हा पालक व नागरिकांचा रास्ता रोको आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड येथील स्टुडन्ट वेल्फेअर इंग्लिश शाळेच्या स्कूल बस अपघातात दुदैवी मृत्यू पावलेल्या 'महिमा ' ला न्याय मिळावा यासाठी पालकांनी व नातेवाईकांनी मागील दहा दिवसापासून ठिय्या आंदोलन – रास्ता रोको आंदोलन करून सुद्धा अद्यापही दोषी असलेल्या संस्था चालकास पोलिस प्रशासन अटक करण्यात अपयशी ठरली आहे. म्हणून पुन्हा एकदा आज दि ५ फेब्रुवारी रोजी महिमा ' ला न्याय मिळविण्यासाठी पळशी फाटा येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले

यावेळी पालकांनी पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्र्नचिन्ह उपस्थित केला होता.उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी आंदोलकांशी बोलताना दि ४ फेब्रुवारी पर्यंत संस्थाचालक दर्शन अग्रवाल व मुख्याध्यापक माधव कदम यास अटक करू असे आश्र्वासन दिले असता आंदोलकांनी आपले आंदोलन मागे घेतले होते .परंतु दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दोन्हीही दोषी आरोपींना अटक न केल्यामुळे संतप्त पालक व नागरिकांनी आज दिनांक पाच फेब्रुवारी रोजी येथील पळशी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करून पोलीस प्रशासनाचा तीव्र निषेध व्यक्त करत पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्र्नचिन्ह निर्माण केले होते .संतप्त पालक व नागरिकांचा रोष बघत्ता उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी तपास अधिकारी बदलल्याने आंदोलकांचा पाच तास सुरू असलेला रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आला.

**रास्ता रोको दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी हणुमंत गायकवाड यांनी सदर प्रकरणातील तपास अधिकारी पोफाळी ठाणेदार यांचे कडून काढून उमरखेडचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांचेकडे दिला आहे . त्यांनी आरोपीला अटक करण्यासाठी वेळ मागितला असून आरोपीला शिक्षा कशी मिळेल या पद्धतीने पोलीस प्रशासन तपास करेल. जनतेने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे .**

# माजी मुख्यमंत्री शिंदेंच्या नातवावर जोक करणाऱ्या विनोदवीराला मारहाण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सोशल मीडियावर अनेक कंटेन्ट क्रिएटर त्यांच्या वेगवेगळ्या शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. काही कंटेन्टसाठी, काही गाण्यांसाठी तर काही विनोदवीर म्हणून प्रसिद्ध आहेत. अशाच एका मराठमोळ्या विनोदवीरावर सोलापूरमध्ये चालू असलेल्या स्टँडअप कॉमेडी शो दरम्यान मारहाण झाल्याची घटना घडली आहे. महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांच्या नातवावर मारलेला जोक प्रणित मोरे या विनोदवीराला चांगलाच महागात पडला. याप्रकरणी प्रणितने शासनाकडे मदत मागितली आहे.

मराठमोळा विनोदवीर महाराष्ट्रीयन भाऊ अशी ओळख असलेल्या प्रणित मोरेचा २ फेब्रुवारी रोजी सोलापुरातल्या २४घ क्राफ्ट ब्रूझ या हॉटेलमध्ये कॉमेडी शो होता. हा शो सायंकाळी ५:४५ वाजता संपला. शो संपल्यानंतर प्रणित चाहत्यांमध्ये फोटो काढण्यास गेला असता समोरून आलेल्या ११-१२ जणांच्या जमावाने त्याच्यावर अतिशय क्रूरपणे हल्ला केला. यानंतर त्यातील गुंडांनी प्रणितला धम कावले ''अगली बार वीर पहारिया बाबा पे जोक मारके दिखा'' असं म्हणाला.

''महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू वीर पहारियावर खोचक विनोद केल्याने ही मारहाण झाली. या हल्ल्याचा खरा सूत्रधार तनवीर शेख आहे. हल्ला झाल्यानंतर माझ्या सहकार्यांनी २४घ क्राफ्ट ब्रूझ हॉटेलच्या मॅनेजरकडे सीसीटीव्ही फुटेज मागितले असता त्यांनी नकार दर्शवला शिवाय हल्ला झाला त्याक्षणी हॉटेलवर काहीच सुरक्षा नव्हती. एका महाराष्ट्रातील कलाकाराची महाराष्ट्रातच गळचेपी होत असून मला न्याय पाहिजे'' असं प्रणितने सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटलं आहे.

कोण आहे वीर पहारिया ?

वीर हा स्मृती शिंदे व संजय पहारिया यांचा मुलगा आहे. वीरचे आजोबा सुशील कुमार शिंदे हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आहेत. वीर पहारियाने 'स्काय फोर्स' या सिनेमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्याच्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलाच धुमाकूळ घातला होता.

# ‘या’ कारणामुळे ऐश्वर्या-अभिषेकचं लग्न मोडता मोडता राहिलं!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्या खासगी आयुष्याशी संबंधित काही बातम्या बऱ्याच काळापासून पसरत आहेत. गेल्या काही काळापासून दोघांच्या घटस्फोटाच्या बातम्या येत आहेत. मात्र, या बातम्यांवर अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही. आज, ५ फेब्रुवारीला अभिषेक बच्चनचा वाढदिवस आहे. अशातच, दोघांच्या लग्नाबाबतचा एक किस्सा चर्चेत आला आहे. तो किस्सा नेमका काय होता, ते पाहुयात.

ऐश्वर्याचा एक जुना व्हिडिओ व्हायरल होत आहे. फिल्मफेअरशी बोलताना लग्नाबद्दल ती म्हणाली होती, आम्हाला खूप काही जुळवून घ्यावे लागते. दोन्ही बाजूंकडून सहमती आणि असहमती होत राहते. पण काहीही झाले तरी संवाद तुटला नाही पाहिजे. यावर माझा विश्वास आहे.

ऐश्वर्या पुढे म्हणाली, अभिषेकने या गोष्टीचा नेहमीच आदर केला आहे. नात्यात संवाद खूप महत्त्वाचा असतो. या सर्वांची सुरुवात मैत्रीने होते का? मैत्री काय आहे? मी अशा लोकांपैकी नाही जे म्हणतात की ठीक आहे आजसाठी हे संपवू. हे उद्यापर्यंत पुढे नेले नाही पाहिजे. तुम्हाला दररोज वेळ द्यावा लागेल. या सर्वांचा अर्थ आदर आहे. आपल्या जोडीदाराचा नेहमी आदर केला पाहिजे. तसेच त्याच्यासाठी भावनिक देखील असले पाहिजे.

अभिषेक त्याची पत्नी एश्वर्याचा खूप आदर करतो. भलेही ते काही काळ एकत्र दिसले नसतील, पण दोघांमध्ये कधीही कोणतेही मतभेद नसल्याचं सांगितलं जातंय. अभिषेक माझा खूप आदर करतो, असंही अनेकदा ऐश्वर्याने देखील सांगितलं आहे.

अमिताभ बच्चन यांनी ब्लॉगद्वारे व्यक्त केल्या भावना

काही काळापूर्वी अमिताभ बच्चन घटस्फोटाच्या अफवांमुळे त्रस्त झाले होते आणि त्यांनी त्यांच्या ब्लॉगवर एक मोठी पोस्ट लिहिली होती. बिग बी यांनी लिहिले होते, वेगळे होण्यासाठी आणि आयुष्यात त्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्यासाठी खूप धैर्य, विश्वास आणि प्रामाणिकपणा आवश्यक आहे. मी माझ्या कुटुंबाबद्दल फार कमी बोलतो, कारण मला ते खासगी ठेवायला आवडते. अफवा फक्त अफवा असतात, त्या पुराव्याशिवाय रचलेल्या खोट्या गोष्टी असतात.

# कोथरुडमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मंत्री तथा आ. चंद्रकांतदादा पाटील यांचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे शहरातील रस्त्यांचे प्रश्न जलदगतीने मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाकडून आवश्यक निधीची तरतूद करणार -मंत्री तथा आ. चंद्रकांतदादा पाटील**



**मुंबई/प्रतिनिधी :** कोथरुड विधानसभा मतदारसंघातील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्यांच्या समस्येवर त्वरित उपाययोजना करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा कोथरुडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी आज मंत्रालयात उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन मिसिंग लिंकससाठी आवश्यक निधी देण्यासंदर्भात निवेदन दिले. मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पुणे शहरातील रस्ते विकासामध्ये येणाऱ्या अडथळ्यांविषयी चर्चा करत, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे शहरातील रस्ते विकासासाठी आवश्यक तो निधी राज्य सरकारकडून दिला जाईल, अशी ग्वाही दिली.

पुणे महापालिकेच्या माध्यमातून शहरातील ३३ प्रमुख रस्त्यांपैकी १५ प्रमुख रस्त्यांच्या विकासासाठी 'मिशन १५' हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी एकूण ८७० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, कोथरुड मतदारसंघातील रस्ते विकासासाठी ३२५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. यापैकी १५० कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारकडून अपेक्षित आहे.

पुणे शहराचा वेगाने होत असलेला विस्तार लक्षात घेता, येथील वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण येत आहे. त्यामुळे रस्ते सुधारणा, पुलांचे बांधकाम आणि वाहतूक व्यवस्थापनासंदर्भात ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. याकरिता राज्य सरकार आणि पुणे महापालिकेच्या संयुक्त प्रयत्नांतून तांत्रिक व प्रशासकीय अडथळे दूर करून विकासकामांना गती देऊन पुणेकरांच्या सोयीसाठी हे काम प्राधान्याने पूर्ण केले जाईल, असे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी स्पष्ट केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# विद्यार्थी हितासाठी कॅरी ऑन योजनेसदर्भात विद्यापीठाने सकारात्मक निर्णय घ्यावा - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थी हितासाठी कॅरी ऑन योजना लागू करण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी देण्यासाठी विद्यापींठाच्या पातळीवर एक समानता ठेवावी अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केल्या.

आज मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व आकृषी विद्यापींठाच्या कुलगुरूची ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीलासर्व विद्यापींठाचे कुलगुरू, कुलसचिव (ऑनलाइन), उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उपसचिव





अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर तसेच राज्यभरातील विविध अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कुलसचिव आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, काही वेळा शैक्षणिक कारणांमुळे किंवा अन्य परिस्थितीमुळे विद्यार्थीना परीक्षा देताना अडचणी येतात त्यांना पुन्हा संधी देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासातील अडथळे दूर करण्यासाठी कॅरी ऑन योजनेचा उपयोग होतो. मात्र याबाबत सर्व विद्यापींठाच्या पातळीवर एकसमानता असली पाहिजे.यासाठी कालबद्ध नियोजन करावे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांचा वर्ष वाया जाऊ नये, यासाठी कॅरी ऑन योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या वर्षासाठी पुन्हा संधी उपलब्ध करून देण्यात यावी.असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी सांगितले.

## संक्षिप्त...

### माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचे बंधू संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या घरावर आयकर खात्याची धाड



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** विधानपरिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचे चुलत बंधू सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या निवासस्थानी आज आयकर विभागाची धाड पडली असून त्यांच्या आर्थिक मिळकतीची आयकर खात्याकडून चौकशी सुरू आहे. संजीवराजे आणि रघुनाथराजे निंबाळकर यांचे निवास्थान असलेल्या जय व्हिला आणि सरोज व्हिला याठिकाणी आज सकाळी ६ वाजता आयकर विभागाची पथके दाखल झाली. याचबरोबर त्यांच्या डेअरीवरही अधिकारी पोहोचल्याची माहिती मिळत आहे. सकाळपासून या ठिकाणी संजीवराजे यांची चौकशी या आयकर विभागाच्या पथकाकडून करण्यात येत आहे.

रामराजे हे सध्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत विधानपरिषदेचे आमदार आहेत तर संजीवराजे आणि रघुनाथराजे यांनी आताच्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटात प्रवेश केला होता. परंतु सध्या संजीवराजे हे पुन्हा अजित पवारांच्या गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरु असतानाच आज आयकर विभागाने टाकलेल्या या छाप्याने सध्या जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

### एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्याच्या पार्श्र्वभूमीवर भाजप पदाधिकाऱ्यांनी बॅनरबाजी




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याची जय्यत तयारी करण्यात आलीय. नांदेडमध्ये एकनाथ शिंदे यांच्या स्वागताचे बॅनर्स मोठ्या प्रमाणात लावण्यात आले आहेत. या बॅनर मध्ये भाजपच्या प्रदेश कार्यकारणी सदस्य असलेले ड. चैतन्यबापू देशमुख यांनी लावलेले बॅनर सध्या नांदेडकरांचे लक्ष वेधून घेत आहे. ही दोस्ती तुटायची नाय, अभेद्य युती अशा आशयाचे हे बॅनर असून, नांदेड शहरात अनेक ठिकाणी मुख्य चौकात असे बॅनर लावण्यात आले आहेत.

### वडनेर भैरव येथील शेतकऱ्यांनी पुणे गाव कालवा वरती होणारे अस्तरीकरण सिमेंट कॉंक्रेट चे काम सुमारे चार तास पाडले बंद



**नाशिक/प्रतिनिधी :** पुणे गाव कालवा या कालव्याची निर्मिती ३५ ते ४० वर्षांपूर्वी ना.का .गायकवाड यांनी केली आहे. मात्र त्या पुणे गाव कालव्यापासून शेतीला व पिण्यास पाणी भरघोस मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी आपली जमीन भूसंपादन केली आहे. मात्र आज रोजी लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी हे त्या पाठांमध्ये सिमेंट क्रॉंक्रीटचे अस्तरीकरण करून पाणी एक्सप्रेस हवे सारखे पुढे घेऊन जात असल्याने त्यांना जागोजागी शेतकरी त्या कामास विरोध करीत आहे.

त्याच अनुषंगाने आज चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव येथील काही शेतकऱ्यांनी पुणे गाव कालव्यावर ठिय्या आंदोलन करत शेतकऱ्यांवर होणारा अन्याय व कॉंक्रिटीकरण काम बंद केलेच पाहिजे अशा प्रकारच्या घोषणाबाजी करत पुणे गाव कालव्याच्या सिमेंट कॉंक्रीट काम करणाऱ्या असलेली विरोध दर्शविला. त्यावेळेस पोलिसांनी व संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले की शासकीय कामात अडथळा आणू नका व कायदा हातात घेऊ नका असे त्यांना सांगण्यात आले ,मात्र त्यांनी कुठलाही विचार न करता आम्ही आज या ठिंकाणी सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे अस्तरीकरण होऊ देणार नाही असे ठामपणे करत सुमारे चार तास आंदोलन करत आपल्या ठाम सीमेवर पाठामध्ये बसून राहिले.

कायदा सुवासस्था अबाधित राहो म्हणून वडनेर भैरव चे एपीआय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे शंभर ते सव्वाशे पोलिसांचा फौज फाटा त्या ठिकाणी हजर होता. संदर्भात वडनेर भैरव येथील सरपंच रावसाहेब भालेराव तसेच संपतराव वक्ते ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्ते वडनेर भैरव यांनी अधिक माहिती दिली तर यावेळी वडनेर भैरव येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री मलंगबाबांचा पालखी सोहळा १२ फेब्रुवारीला; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आरतीस राहणार उपस्थित

**कल्याण/प्रतिनिधी :** श्री मलंगबाबांचा पारंपरिक पालखी सोहळा बुधवार, १२ फेब्रुवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. हिंदू परंपरेनुसार श्री मलंगगडावर हा सोहळा दरवर्षी पार पडतो. या वर्षी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे समाधीस्थळी आरती करणार आहेत.




हिंदू परंपरेनुसार श्री मलंगगड हिंदू तीर्थक्षेत्र असून, अनेक धार्मिक विधी येथे पार पडतात. मात्र, या स्थळी वादग्रस्त अतिक्रमण झाले असून, न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले.मलंगबाबांचा पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. यावर्षीही हजारो शिवसैनिक व हिंदू संघटनांचे कार्यकर्ते श्री मलंगगडावर जाऊन मलंगबाबांचे दर्शन घेतील.

१२ फेब्रुवारीच्या रात्री ७ वाजता जोशी बाग (श्री मलंगगडाचा पायथा) येथे शिवसेना, बजरंग दल आणि विश्र्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते एकत्र जमून पालखी सोहळ्यासाठी श्री मलंगगडावर जाणार आहेत. त्यानंतर पहाटे गंधलेपन विधी पार पडेल, तर १६ फेब्रुवारी रोजी श्री मलंगबाबांचे वार्षिक स्नान होईल.हिंदूंची वहिवाट हाच श्री मलंग मुक्तीचा मार्ग या विचारानुसार हिंदू संघटना हे जागरण सुरू ठेवणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. आयोजकांनी या उत्सवात सर्व हिंदू भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शांतता आणि भक्तिभावाने सोहळा साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

## बुलडाणा शहरातील जनतेने आयुष्यमान भारत योजनेसाठी नोंदणी करावी! : गणेश पांडे



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गोरगरीब जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावे या हेतूने सन २०१८ पासून आयुष्मान भारत योजना केंद्र सरकारने अंमलात आणली असून यात ५ लाखापर्यंतचा वार्षिक विमा दिला जात आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येकाकडे आयुष्यमान भारत कार्ड असणे गरजेचे असून बुलडाणा शहरातील गरजुवंत नागरिकांनी आयुष्यमान भारत कार्ड अवश्यय काढावे असे आवाहन बुलडाणा नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी केले आहे.

बुलडाणा जिल्ह्यात आयुष्यमान भारताचे कार्ड कमी प्रमाणात काढलेले आहे त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यातील जनतेला याचा लाभ कमी मिळणार,अशी खंत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

या विषयावर बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेऊन जिल्ह्यात जास्तीत जास्त आयुष्यमान भारत कार्ड तयार करून घेण्याचे निर्देश दिले.त्या अनुषंगाने बुलडाणा नगरपालिकेचे मुख्य अधिकारी गणेश पांडे यांनी नगरपालिकेत एक बैठकीचे आयोजन केले त्यात शहरातील अंगणवाडी सेविका, मदतनीस,आशा वर्कर तसेच नगरपालिका शाळेतील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना बोलविण्यात आले. प द्वारे आयुष्यमान भारत कार्ड कसा तयार करावा याबाबत आयुष्यमान भारतचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेक सावके यांनी उपस्थितांना माहिती दिली.बुलडाणा शहरात आयुष्यमान भारत कार्ड तयार करून घेण्यासाठी विविध स्तरावरून प्रयत्न केले जाणार जेणेकरून गोरगरीब जनतेला याचा लाभ मिळेल,अशी माहिती मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी दिली आहे.बैठकीत आयुष्यमान भारतचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेक सावके,आरोग्य मित्र पियुष सावळे,नितीन गवई, स्वप्नील इंगळे,डॉ.प्रिया भोसले,डॉ.योगेश सावळे, महेंद्र सोभागे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## जिल्हा रुग्णालयात जागतिक कर्करोग दिवस साजरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जागतिक आरोग्य संघटनेमार्फत दि. ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्यादिनाचे औचित्त साधुन आरोग्य विभागाकडुन राज्यभर राबवल्या जाणाऱ्या कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेचे जिल्हा स्तरीय उद्घाटन आमदार संजय गायकवाड यांचे हस्ते संपन्न झाले.

कर्करोगाबाबत जनजागृती निर्माण व्हावी व ह्या रोगाच्या प्राथमिक अवस्थेत त्याचे निदान होवून योग्य वेळी उपचार व्हावे, हा त्यामागचा प्रमुख हेतू आहे. ह्यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे णछ्खढ्ए इध णछ्खटणए या थीमसह जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या संकल्पनेतून जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून कर्करोग निदान व जनजागृती मोहीम राज्यभरात आयोजित करण्यात आले आहेत. या मोहिमेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी उद्घाटन करण्यात आले. राज्यस्तरावरील मोहिमेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे थेट प्रसारण जिल्हास्तरावर आयोजित उद्घाटन कार्यक्रमात करण्यात आले.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रणजीत मंडाले, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते, इंडीयन डेंटल असोसियशनचे जिल्हा अध्यक्ष डॉ. जतकर व जिल्हा सचिव डॉ.गवई आदी उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी आमदार संजय गायकवाड यांनी शासनाच्या विविध योजनाची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्यस्तरावर वेळोवेळी पाठपुरवठा करण्यात येईल, असे सर्व उपस्थितांना आश्वासित केले.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले ह्यांनी कर्करोग निदान व जनजागृती मोहीम तसेच राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाबाबत विस्तृत प्रस्तावना उपस्थितांना विषद केली. तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील यांनी गर्भाशय मुख कर्करोगाबाबत प्राथमिक अवस्थेत निदानाच्या विविध पद्धतीचा उपयोग शासकीय यंत्रणेत कसा करावा, ह्या बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान जिल्ह्यातील कर्करोग तज्ञ डॉ. निखील नलावडे, हृदयरोग तज्ञ डॉ. दीपक लद्धड, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मगर यांचा कर्करोग क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला.

जिल्हास्तरीय उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे प्रभारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. पंकज राठोड ह्यांनी केले. कार्यक्रमादरम्यान जिल्हा रुग्णालयातील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी, मुख्य अधिपरिचारिका, परिचारिका जिल्हा परिचर्या प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या, प्राध्यापक व विद्यार्थिनी, नागरिक उपस्थित होते.

## दहावीच्या निरोपसमारंभात शिक्षकानेच घेतला अखेरचा निरोप!

**पालघर/प्रतिनिधी :** दहावीच्या परीक्षा तोंडावर आल्या आहेत. महाविद्यालयांमध्ये सध्या निरोप समारंभाचे वारे वाहत आहेत. अशातच पालघरमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात भाषण करत असताना शिक्षकाला गहिवरुन आले. दाटून आलेला त्यांचा तो हुंदका त्यांच्यासाठी काळच ठरला. बोलता बोलता ते अचानक थांबले. भारावलेल्या वातावरणात सर्वजण यावेळी हळवे झाले होते. तोच काही क्षणात ते शिक्षक जागेवरच कोसळले. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले. पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी आलेल्या या शिक्षकानेच या मुलांसह शाळेचा देखिल अखेरचा निरोप घेतला. ही दुर्दैवी घटना पालघर जिल्ह्यातील मनोर येथे घडली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पालघर तालुक्यातील मनोर येथे लालबहादूर शास्त्री शाळेत काल (दि. ४) दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. या निरोप समारंभात अनेक शिक्षकांनी मुलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे कॉपी मुक्त अभियान

### मार्गदर्शक सूचनाचे पालन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचेमार्फत इयत्ता बारावीची परिक्षा दि. ११ फेब्रुवारी तर इयत्ता दहावीची परीक्षा दि. २१ फेब्रुवारीपासून सूरु होत आहे. जिल्ह्यात परीक्षाचे संचालन योग्य प्रकारे व्हावे व परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी जिल्ह्यात 'कॉपी मुक्त अभियान' राबविण्यात येत असून मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना जाहिर केले आहे. या सूचनाचे पालन करण्याचे आवाहन दक्षता समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

**मार्गदर्शक सूचना याप्रमाणे**

परीक्षा केंद्र परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रांच्या ५० मीटर परीसरातील कॉम्प्युटर सेंटर, झेरॉक्स सेंटर, मोबाईल सेंटर परीक्षा सुरु होण्यापूर्वी दोन तास आधी पासुन परीक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्यात यावे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उपलब्ध असून चित्रीकरणाची साठवणूक होत असल्याची खातरजमा करावी. कॉपी मुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख यांनी परीक्षा केंद्रांस भेट देण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. जिल्ह्यामध्ये एकूण १६ परिरक्षक केंद्र आहेत. सर्व परिरक्षक केंद्रावर सी.सी. टी.व्ही. कार्यन्वित आहे. तसेच परिरक्षक केंद्रावरून पेपर घेतल्याची वेळ व पेपर जमा करण्याची वेळ याबाबत सी.सी. टी.व्ही. द्वारे नजर ठेवण्याचे सूचित केले आहे. परिरक्षक केंद्रावरून पेपर घेऊन जाणे आणि जमा करण्यासाठी ज्या संस्थेचे किंवा शाळेचे परीक्षा केंद्र आहे. त्या शाळेच्या संस्था प्रमुख, शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रसंचालक यांच्या मार्फत नियुक्त असलेला रनर शिक्षक यांनी चारचाकी वाहनाचा वापर करण्यासाठी आदेशित केले आहे. कॉपीमुक्त मोहिम यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यामध्ये आठ भरारी पथक तयार करण्यात आले आहे.

इयत्ता बारावी परीक्षेसाठी जिल्ह्यामध्ये ११६ परीक्षा केंद्र असून परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थी संख्या ३४ हजार ६३५ आहे. तसेच इयत्ता दहावी परीक्षेसाठी जिल्ह्यामध्ये एकूण १५९ परीक्षा केंद्र असून परीक्षार्थी संख्या ४० हजार १९४ आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर महसूल विभागाची बैठे पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. बैठे पथक परीक्षा सुरु होण्यापूर्वी परीक्षा केंद्रावर किमान एक तास अगोदर तसेच परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका परिरक्षण केंद्रावर उपस्थित राहील. परीक्षेशी संबंधित घटकांनी नियमबाह्य पद्धतीने मोबाईल अथवा इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर परीक्षा केंद्रावर होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे.



परीक्षा कॉपीमुक्त व शातंतापूर्ण वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. परीक्षेत गैरप्रकारांना वाव मिळाल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊन शैक्षणिक दर्जा खालाऊ शकतो. त्यामुळे भावी पिढी सक्षम होणार नाही आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी व टिकविण्यासाठी सदर परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त, तणावमुक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी परीक्षा संबधित अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांनी पारदर्शकपणे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# अवैध सावकारी मुळापासून उखडून काढणार : आ. खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शहरात व मतदार संघात मोठ्या प्रमाणात अवैध सावकारी सुरू आहे.हप्त्याला व्याज वसुली केली जाते. व्याजाची रक्कम न दिल्यास संबंधित व्यक्तीला मारहाण करणे, उचलणे,त्यांचा छळ करणे असा प्रकार सुरू आहे.या प्रकाराला निश्रि्चत आळा घालून मेहकर लोणार तालुक्यातील संपूर्ण अवैध सावकारी मुळापासून उखडून काढणार अशी ग्वाही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली.


तसेच अवैध सरकारी बाबत तक्रार करा दोषींना कोण पाठीशी घालतो ते मी बघून घेतो,त्यावर काय निर्णय घ्यायचा ते मी ठरवितो, अशी तंबी आमदार सिद्धार्थ खरात यांनी अवैध सावकारी बाबत दिली. तसेच अवघ्या दोन महिन्यात मतदारसंघातील अवैध दारू विक्री, वरली मटका आदी पूर्णपणे बंद केल्याचेही आमदार खरात यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.



यावेळी पुढे बोलताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, मेहकर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध सावकारी सुरू आहे. ही सावकारी गोरगरिबांच्या गळ्याचा फास बनत आहे. तसेच अवैध सावकारीने अनेकांचे संसारे उध्वस्त केले आहेत. मागील आठवड्यामध्ये आलेल्या सहकार दिंडीतही मी लघु व्यावसायिकांच्या कर्जाचा प्रश्न उपस्थित करून त्यांना सहज कर्जपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी पाठपुरावा केला. पतसंस्था बळकट झाल्या पाहिजे ही माझी प्रामाणिक इच्छा आहे. मात्र, पतसंस्था, बँका गोरगरीब शेतकऱ्यांना, लघुउद्योगांना कर्ज पुरवठा करत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

भाजीपाला विक्रेते,किरकोळ व्यावसायिकांना पतसंस्थानी पैसा दिला पाहिजे. मात्र, तो दिला जात नाही. परिणामी मोठ्या प्रमाणात अवैध सावकार की फोफावली आहे. ५० हजार रुपये द्यायचे आणि आठवड्याला त्याचे दहा हजार रुपये व्याज घेतले जात आहे. व्याज न दिल्यास संबंधित व्यक्तीवर कठोर अत्याचार करायचा, त्याला उचलून आणायचे, मारहाण करायची असे प्रकार सुरू आहेत. अवैध सावकारकीतून अनेक घातपातही झाले आहेत. हा सर्व प्रकार सुरू असताना युगपुरुष, विकासपुरुष म्हणून घेणाऱ्या नेत्यांनी यावर का आळा घातला नाही असा प्रश्र्नही यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला आमदारकीच्या निवडणुकीनंतर अवघे दोन महिन्याचा कालावधी झाला आहे.या दोन महिन्याच्या कालावधीत मतदारसंघातील वरली, मटका, अवैध दारू विक्री आदी प्रकार बंद झाले आहेत.

अवैध सावकारी करणाऱ्या संदर्भात तक्रार केल्यास पोलीस स्टेशनचे कडून अवैध सावकारांना पाठीशी घातले जाते असा प्रश्र्न पत्रकारांनी केला असता आमदार सिद्धार्थ खरात यांनी अवैध सावकारीबाबत किंवा अवैध धंद्याबाबत तक्रार करा आणि त्यांना कोण पाठीशी घालतो हे मी बघतो, त्याबाबत काय निर्णय घ्यायचा हे मी ठरवतो, असा आक्रमक पवित्रा घेत मेहकरसह मतदार संघातील अवैध सावकारी मुळासह उखडून काढली जाईल, अशी ग्वाही यावेळी दिली.



## विविध वृत्त...

### सामाजिक न्याय विभागाचे पुरस्कार; १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय विभागामार्फत समाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व स्वंयसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी पुरस्कार देवुन गौरविण्यात येतात. त्याअनुषंगाने इच्छुक व पात्रताधारक व्यक्ती व संस्थानी दि. १५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन समाजकल्याण कार्यालयाचे सहायक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडक समाजभुषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सन्मानपुर्वक गौरविण्यात येतो. याबाबत शासनाने सन २०२३-२४ वर्षासाठी दि.०१ फेब्रुवारी रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने पात्र व्यक्ती, संस्था यांनी सहा पुरस्कारांचे अर्ज प्राप्त चेकलिस्टनुसार प्रस्ताव तयार करुन तीन प्रतीमध्ये सहायक आयुक्त, समाज कल्याण, बुलडाणा यांचे कार्यालयात विहित मुदतीत सादर करावेत. सदर अर्ज शासनाचे संकेतस्थळ https //sjsa.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत. तसेच पात्रतेचे निकष, अटी, शर्ती संदर्भातील माहिती सहायक आयुक्त,समाज कल्याण कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अवैध दारूसह ३ लाख ६ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त मेहकर पोलिसांची कामगिरी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** अवैधरित्या दारू घेऊन जाणाऱ्यांवर मेहकर पोलिसांनी कारवाई करून ६ हजार ८० रुपयांची दारू व तीन लाख रुपये किमतीची वाहन असा एकूण तीन लाख सहा हजार ऐंशी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.ही कारवाई मेहकर पोलिसांच्या वतीने ३ फेब्रुवारी रोजी मेहकर शहरातील लोणार फाटा येथे करण्यात आली. याप्रकरणी प्रभाकर दिगंबर मगर रा. देऊळगाव माळी ता. मेहकर या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेबाबत प्राप्त माहितीनसार परि पोउपनि संदीप लक्ष्मण मेधणे यांनी मेहकर पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, पोलीस प्रशासनाला गोपनीय माहिती मिळाली की एका वाहनातून अवैधरित्या वाहतूक करीत आहे. या माहितीवरून मेहकर शहरातील लोणार फाटा येथे नाकाबंदी करुन संशयीत वाहन थांबवुन त्याची पंचा समक्ष झडती घेतली असता आरोपी प्रभाकर डिगांबर मगर वय ५६ रा. देउळगांवमाळी ता. मेहकर जि बुलडाणा हा वाहनामध्ये अवैधरित्या विदेशी,बियर असा एकुण ६ हजार ८० रपयाचा मुद्देमाल व हुडयाइ कंपनीची एम.एच. १२ एल.पी ५८७७ या क्रमांकाची तीन लाख रुपये किमतीची कार असा एकुण ३ लाख ६ हजार ८० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला.सदर फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध मेहकर पोलीस स्टेशन मध्ये दारूबंदी कायदासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेका सुरेश काळे करीत आहे.

### टोरेस घोटाळ्यात सहभागी युक्रेनच्या अभिनेत्याने बनावट जन्म दाखला करुन घेतल्याचे उघड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** टोरेस घोटाळ्यात सहभागी असल्याच्या संशयावरुन मुंबई पोलिसांनी युक्रेनच्या आर्मन अतेन या अभिनेत्याला मालाड मालवणी येथून अटक केले आहे. या अभिनेत्याने बनावट जन्मदाखला दाखवून भारतीय असल्याचा दावा केला होता. प्रत्यक्षात आर्मन अतेन युक्रेनचा आहे. त्याने बनावट जन्मदाखला दाखवून भारतात आधारकार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना आणि इतर सरकारी कागदपत्रे तयार करुन घेतली होती. मुंबई पोलिसांनी महापालिका प्रशासनाच्या मदतीने पडताळणी केली आणि बनावट जन्मदाखला दाखवून आर्मन अतेन फसवणूक करत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

## शिवसेना डोणगाव विभागप्रमुखपदी दिपक गायकवाड यांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची बुलढाणा जिल्हा (घाटावरील पदाधिकारी) यांची विभागीय स्तरीय संघटनात्मक आढावा बैठक तसेच उपनेते व आमदार नितिनबापु देशमुख (बाळापूर) व आमदार सिद्धार्थ खरात यांचा सत्कार कार्यक्रम ५ फेब्रुवारी रोजी घेण्यात आला. यावेळी शिवसेना डोणगाव विभागप्रमुखपदी सामाजिक कार्यकर्ते दिपक दिनकरराव गायकवाड यांची शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख, माजी जिल्हा प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांनी शिवसेना वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात नियुक्ती केली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर हे होते. तर, यावेळी जिल्हाप्रमुख जालींधर बुधवत, सह संपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख विजयाताई खडसान, जिल्हा संघटक गोपाल बछिरे, युवासेना जिल्हा प्रमुख नंदू कजहाडे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, शहर प्रमुख किशोर गारोळे, युवासेना तालुका अधिकारी आकाश घोडे, महेंद्र पाटील,ॲड.दिपक मापारी, लखन गाडेकर, किसन धोंडगे, विधानसभा संघटक किसन पाटील, माजी जि.प.सदस्य दिलीप वाघ,किसान सेना उपजिल्हा प्रमुख नारायण बळी, जिजाताई राठोड, तारामती जाधव, स्वाती नवले, संजीवनी वाघ, आरती देशमुख, माजी नगराध्यक्ष,अशोक अडेलकर,संदीप गारोळे, ॲड.संदीप गवई,भागवत बोरकर,युवा सेना शहर अधिकारी ऋषी जगताप,नगमा गवळी,माजी जि.प.सदस्य संजय वडतकर, वसंतराव आलटे, माजी सभापती सतिश ताजने आदी पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

यावेळी दिपक दिनकरराव गायकवाड यांची डोणगाव विभाग प्रमुखपदी नियुक्ती करून नियुक्तीपत्र देण्यात आले.तसेच नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रात शिवसैनिकांना सोबत घेऊन शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने पुनीत झालेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकत वाढवून पक्षसंघटन मजबूत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. तर, नियुक्तीसंदर्भात बोलताना दिपक गायकवाड यांनी पक्षाने माझ्यावर टाकलेली जबाबदारी करून शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या विश्र्वासाला तडा जाऊ देणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. या निवडीबद्दल दिपक गायकवाड यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून संचालन केले.तालुका प्रमुख निंबाजी पांडव यांनी आभार मानले.यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, चंद्रपूरातून २०३ जेष्ठ नागरिक (बौद्धगया) दर्शनासाठी रावाना



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १४ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या अंतर्गत दि. ५ ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत तीर्थदर्शनाचे नियोजन करण्यात आले होते.



चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २०३ लाभार्थी महाबोधी मंदीर (बौद्धगया) तीर्थदर्शनकरीता पात्र करण्यात आले. आज चंद्रपुरातील सर्व लाभार्थी नागरिकांना आमदार देवराव भोंगळे यांनी ट्रेनला हिरवी झेंडी दाखवत बोधगया येथे रवाना करण्यात आले. यावेळी निवडणूक आदी जे शब्द जेष्ठ नागरिकांना दिला होता. त्या शब्दाचा पूर्तता आज या योजने मार्फत होत असल्याचे प्रतिक्रिया आमदार देवराव भोंगळे यांनी दिली. ५ फेब्रुवारी रोजी संध्यकाळी चंद्रपूरातून रेल्वे निघाली व दि. ६ फेब्रुवारीला बौद्धगया येथे पोहोचणार आहे. तर दि. ७ फेब्रुवारी रोजी लाभार्थ्यांना तीर्थदर्शनाचा लाभ मिळणार आहे. ७ फेब्रुवारीला रात्री सदर रेल्वे बौद्धगया येथून परतणार असून ९ फेब्रुवारी रोजी चंद्रपूर येथे पोहोचणार आहे. याप्रमाणे लाभार्थ्यांना तीर्थदर्शनाचा लाभ घेता येणार असल्याचे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी माहिती दिली.

यावेळी लाभार्थी नागरिकांनी राज्याचे मुख्यमंत्री यांचे मनःपूर्वक आभार मानले, ते म्हणाले की, काही कारणास्तव आम्ही तिर्थदर्शनाला जाऊ शकत नाही मात्र आमच्या मनातील बाब या सरकारने ओळखत आमच्या तिर्थदर्शनाची जबाबदार घेतली, आज आम्ही दर्शनाला जात आहोत.

## गणपती नगर मध्ये बिबिट्याचा मुक्त संचार, सीसीटिव्ही कॅमेऱ्यामध्ये बिबट्या कैद

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहरातील गणपती नगर मध्ये बिबट्याचा संचार वाढला असून या परिसरात तो कुत्र्यांची शिकार करीत आहे सदर बिबट्या चार आणि पाच फेब्रुवारीच्या मध्यरात्री एका घरावर लावलेल्या सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे बिबट्याचा मुक्त संचार होत असल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गणपती नगर हा बुलढाणा शहराचा विस्तारित भाग असून अगदी अजिंठा पर्वतरांगेच्या काठावर वसलेला आहे.हनवतखेड परिसरातील बुलढाणा नगरपालिकेचा डम्पिंग ग्राउंड जवळ आहे.या डम्पिंग ग्राउंडवर अन्नाच्या शोधात असलेले वन्य प्राणी शहरी भागाकडे सुद्धा येत असतात. गणपती नगरात मागील काही महिन्यापासून बिबट्या रात्रीच्या वेळी येत आहे. याबद्दल स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे लेखी अर्ज करून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केलेली आहे, परंतु अद्याप पर्यंत योग्य पाऊल



उचलण्यात आलेला नाही. काल मध्यरात्री एक बिबट्या कुत्र्यांची शिकार करण्यासाठी गणपती नगर मध्ये शिरला होता आणि एका घरावर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तो कैद झाला आहे. वन विभागाने या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक डी.बी.तडवी यांनी आज ५ फेब्रुवारीला दुपारी ३ वाजेच्या सुमारास वन विभागाकडे केली आहे.

# एकाच कामाचे आजी-माजी आमदाराकडून उद्घाटन

## माजी आमदाराचे कार्य हास्यास्पद : आ. सिद्धार्थ खरात यांची टीका

**तुम्हारे पाव के नीचे कोई जमीन नही, कमाल ये है कि तुम्हे यकीन नही. अशीच स्थितीही माजी आमदारांची झालेली आहे.- आ. सिद्धार्थ खरात**

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदार संघातील एकाच कामाचे आजी-माजी आमदाराकडून उद्घाटन केले जात असल्याने मतदार संघात याबाबत चांगलीच चर्चा होत आहे. तर, विद्यमान आमदार यांनी या प्रकाराबाबत प्रसार माध्यमासमोर भाष्य करत माजी आमदाराचे कार्य हे हास्यस्पद असल्याचे सांगून माजी आमदारच्य या कृत्यावर सडकून टीका केली आहे .





मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात एकाच कामाचे आजी-माजी आमदाराकडून उद्घाटन केले जात असल्याने याबाबत मतदारसंघात उलट सुलट चर्चा आहे.कामाचे श्रेय घ्यायचे की यामधून कोणता विकास साधायचा याबाबत संपूर्ण मतदारसंघात उलट सुलट चर्चा चालू आहे.या प्रकाराबाबत विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांनी प्रसारमध्यमासमोर भाष्य करीत माजी आमदाराच्या कार्यावर टीका केली. माजी आमदाराचे कार्य आहे हे हस्यास्पद आहे.

या उद्घाटनाच्या कामातून त्यांना श्रेय लाटायचे की आणखीन दुसरे काही साध्य करायचे हे त्यांचे त्यांनाच माहीत. त्यांचा हा प्रकार अत्यंत केविलवाणा आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना बोलवून तसेच विद्यमान आमदाराच्या उपस्थितीत विकास कामाचे उद्घाटन करावे. मात्र, ते आपल्याच अविर्भावात राहत असल्याने व मी सध्याही विद्यमान आमदार आहे. याच तोऱ्यात वागत असल्याने त्यांच्या बुद्धीचा विकास झाला नाही हे यातून दिसून येते. एका शाहीराने लिहिलेले आहे की तुम्हारे पाव के नीचे कोई जमीन नही, कमाल ये है कि तुम्हे यकीन नही. अशीच स्थितीही माजी आमदारांची झालेली आहे. विद्यमान आमदार हे निवडून आले आहेत असे ते मानायला तयार नाहीत व माझा पराभव झाला आहे असेही ते स्वीकारायला तयार नाहीत. त्याबाबत मला बोलायचे नाही त्यांच्या बुद्धीचा विकास झाला नाही त्यांचा लखलाभ त्यांनाच. ते कशासाठी हे करत आहेत याबाबत मी बोलणार नाही असे मत व्यक्त करत माजी आमदारांच्या या कृत्याबद्दल आमदार सिद्धार्थ खरात यांनी मात्र चांगलीच टीका केली.

आमदारांनी माजी आमदारांनी विकास कामाचे उद्घाटन करण्यासाठी अधिकाऱ्यांना सांगावे विद्यमान आमदारांना बोलवावे आणि त्यांनीही यावे आणि विकास कामासाठी सहकार्य करावे,असे आवाहन यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.